# लाच स्वीकारताना प्रांताधिकाऱ्यास पकडले

## आंबेगाव-जुन्नर तालुक्यात खळबळ

**मंचर, ता. २७ :** आंबेगाव-जुन्नर विभागाचे उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे यांना दोन लाख रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पुणे पथकाने शुक्रवारी (ता.२७) दुपारी मंचर येथील प्रांत कार्यालयात रंगेहाथ पकडले. या घटनेमुळे आंबेगाव-जुन्नर तालुक्यात खळबळ उडाली आहे.

लाच लुचपत प्रतिबंधक पुणे विभागाचे साहाय्यक आयुक्त दयानंद गावडे यांनी याबाबत दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे की, तक्रारदार हे बांधकाम व्यावसायिक असून, नारायणगाव (पुणे-नाशिक महामार्ग) परिसरात संयुक्त भागीदारीत सुरू असलेल्या प्रकल्पासाठी अंशतः पूर्णत्व प्रमाणपत्र मिळविण्यासाठी त्यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर केला होता. संबंधित इमारतीची सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले असून आवश्यक शासकीय परवानग्या व ना हरकत प्रमाणपत्रे मिळविण्याची जबाबदारी तक्रारदारांकडे होती. या प्रस्तावाबाबत पाठपुरावा करत असताना शुक्रवारी (ता. २०) गोविंद शिंदे यांनी अंशतः पूर्णत्व प्रमाणपत्र मंजूर करून देण्यासाठी पाच लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. याबाबत तक्रारदारांनी मंगळवारी (ता. २४) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार लुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी पडताळणी कारवाई केली असता आरोपी अधिकाऱ्याने दोन लाख रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सापळा रचून शुक्रवारी दुपारी तीन वाजता मंचर येथील उपविभागीय कार्यालयात तक्रारदाराकडून दोन लाख रुपये स्वीकारताना शिंदे यांना रंगेहाथ पकडण्यात आले. याप्रकरणी मंचर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया पुणे लाचलुचपत प्रतिबंध विभागाचे पोलिस निरीक्षक प्रसाद लोणारे व निरीक्षक प्रवीण निंबाळकर यांनी सुरू केली.

# विद्यापीठात साकारणार स्वतंत्र पदवी प्रशाळा

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांची घोषणा

**पुणे, ता. २७ : ''सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात लवकरच 'स्कूल ऑफ अंडरग्रॅज्युएट स्टडीज' सुरू करण्याचा मानस आहे. यामध्ये विशिष्ट विषयात अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान पदवी अभ्यासक्रम (बी. ई. आणि बी. टेक.) सुरू करण्याचा विचार आहे. यासाठी भारतीय अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थेसमवेत अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत चर्चा झाली आहे. या विषयातील एक अभ्यासक्रम लवकरच सुरू होईल,'' अशी घोषणा कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी अधिसभेत केली. विद्यापीठात विशिष्ट पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी ही 'स्वतंत्र प्रशाळा' स्थापन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.**



अधिसभेचे इतिवृत्त वाचण्यास सुरुवात झाली असता, अनेक सदस्यांना अद्ययावत इतिवृत्त मिळाले नसल्याची बाब समोर आली. त्यानंतर प्रभारी कुलसचिव डॉ. चारुशीला गायके यांनी इतिवृत्त सदस्यांपर्यंत टपालाद्वारे पोचविले असल्याचे सांगितले. मात्र, तरीही सदस्यांनी अद्ययावत इतिवृत्त देण्याची मागणी केली. त्यावर, शनिवारी सकाळपर्यंत सर्व सदस्यांना इतिवृत्त मिळेल, तोपर्यंत अधिसभा तहकूब करण्यात येत असल्याची घोषणा डॉ. गोसावी यांनी केली. त्यामुळे २०२६-२७ चा अर्थसंकल्प शनिवारी (ता. २८) अधिसभेत सादर करण्यात येणार आहे.

### विभाग शाश्वत संशोधन अनुदान

विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये उच्च दर्जाचे संशोधन आणि पेटंटसाठीचे प्रयत्न सुरू आहेत. राज्य सरकारच्या आदेशानुसार विद्यापीठांमधील विभागांतर्गत फ्रेमवर्क रँकिंग करण्यात येईल. त्याअंतर्गत विविध विभागांना बळ देण्यासाठी 'विभाग शाश्वत संशोधन अनुदान' योजना सुरू केली जाईल. विभागांच्या रँकिंगनुसार त्या-त्या विभागांना दहा, आठ, सहा, चार, दोन लाख रुपयांपर्यंत अनुदान दिले जाईल, असे डॉ. गोसावी यांनी स्पष्ट केले.

### आंतरराष्ट्रीय अतिथी विद्याशाखा योजना

''अर्थसंकल्पात संशोधन आणि संवर्धन योजनेवर भर दिला आहे. अध्यापक आदानप्रदान उपक्रमात आशियाई देशातील काही प्राध्यापक आपल्याकडे येतील आणि आपले काही प्राध्यापक दोन ते आठ आठवडे अशा लघुकाळासाठी तिकडे जातील. यातील प्राध्यापक 'प्रतिष्ठित प्राध्यापक' (डिस्टिंग्विश प्रोफेसर) म्हणून असतील. जागतिक आणि राष्ट्रीय मानांकनामध्ये संबंधित विद्यापीठात आंतरराष्ट्रीय स्तरावरील किती प्राध्यापक आहेत, याचा विचार होतो. त्यादृष्टीने 'आंतरराष्ट्रीय अतिथी विद्याशाखा योजना' राबविण्याचा मानस आहे. यात जागतिक दर्जाच्या आघाडीच्या विद्यापीठांमधील संशोधनात सर्वोच्च असणाऱ्या प्राध्यापकांचा समावेश असेल. हे प्राध्यापक अभ्यासक्रम विकसित करण्यात आणि संशोधनात विद्यापीठाला जागतिक स्तरावर घेऊन जाण्यात सहकार्य करतील,'' असे डॉ. गोसावी यांनी सांगितले.

### मानद प्राध्यापक नेमण्याचा प्रस्ताव

नामवंत उद्योग समूहातील मुख्य कार्यकारी अधिकारी, संचालक यांना 'मानद प्रतिष्ठित प्राध्यापक' (ऑनररी डिस्टिंग्विश प्रोफेसर) म्हणून आमंत्रित करण्यात येईल. यात संरक्षण संशोधन व विकास संस्था (डीआरडीओ), भारतीय अंतराळ संशोधन संस्थेतील (इस्रो) शास्त्रज्ञ यांच्या ज्ञानाचा लाभ विद्यापीठातील शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी करण्यात येईल.

### वादळी चर्चा

'रुसा'अंतर्गत ६२ कोटी रुपयांचा निधी अखर्चित का ठेवण्यात आला, 'विद्यापीठात अधिष्ठाता, परीक्षा संचालक नियुक्ती करण्यात येत नाही,' याबाबत आवाज उठवत व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी अधिसभेत वादळी चर्चा घडवून आणली. सदस्य सागर वैद्य यांनी जमिनीवर बसत निषेध नोंदविला, तर सदस्य बागेश्री मंठाळकर यांनीही मोठ्या आवाजात आपले मुद्दे मांडले.

### विद्यापीठातील लॉबी कुलगुरूंना करतेय 'लक्ष्य'

**■ विद्यापीठात विविध प्रकारे विशिष्ट दबावगट (लॉबी) या-ना-त्या प्रकारे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्यावर दबाव टाकण्याचा अप्रत्यक्ष प्रयत्न करत असल्याची चर्चा शिक्षण वर्तुळात होत आहे. असे असतानाच अधिसभेत व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी वादळी चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न सुरू केल्यानंतर अखेर कित्येक दिवस मौन बाळगलेल्या कुलगुरूंनी, ''विद्यापीठातील विशिष्ट लॉबी कुलगुरूंना 'लक्ष्य' करत आहे,'' असे वक्तव्य केले.**

## गुन्हे वृत्त

### पुणे उपमहापौर कार्यालयात मारहाण

**पुणे :** उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या कार्यालयात तक्रार घेऊन आलेल्या व्यक्ती व तेथे उपस्थित तरुणांमध्ये किरकोळ कारणावरून मारहाणीचा प्रकार घडला. ही घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पुणे स्टेशन येथील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या परिसरातील मंडप महापालिकेकडून काढण्यात आला. याबाबत तक्रार करण्यासाठी काही कार्यकर्ते वाडेकर यांच्याकडे आले. त्यावेळी चर्चा सुरू असताना अचानक तक्रार करणाऱ्या व्यक्ती व तेथे उपस्थित तरुण यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला. त्यानंतर त्यांच्यात मारहाण झाली. त्यामुळे उपमहापौरांच्या कार्यालयात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यात महापालिकेच्या सुरक्षारक्षकांनी हस्तक्षेप केला. वाद मिटविण्यासाठी उशिरापर्यंत बैठक सुरू होती.

### कोरेगाव पार्कमध्ये वेश्याव्यवसाय

**पुणे :** कोरेगाव पार्क परिसरात स्पा सेंटरच्या आड सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाच्या रॅकेटवर गुन्हे शाखेने कारवाई करत दोन पीडित महिलांची सुटका केली. या प्रकरणी एका महिलेला अटक केली आहे. या कारवाईमुळे शहरातील स्पा सेंटरच्या आड अनैतिक व्यवसाय सुरू असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी कोरेगाव पार्क पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रीती हृषीकेश नायर (वय २१) हिला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ढोले पाटील रस्त्यावरील एका इमारतीत 'किन्नरी सलून अँड स्पा' येथे मसाज सेंटरच्या नावाखाली महिलांकडून वेश्याव्यवसाय करून घेतला जात असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला मिळाली होती. बनावट ग्राहक पाठवून पडताळणी केल्यानंतर कारवाई करण्यात आली. यामध्ये दोन पीडित महिलांची सुटका केली. ही कारवाई पोलिस निरीक्षक छगन कापसे यांच्या पथकाने केली.

### नेहरूनगरातील तरुणाची आत्महत्या

**पिंपरी :** तरुणाने राहत्या घरी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. ही घटना पिंपरीतील नेहरूनगर येथे शुक्रवारी (ता. २७) दुपारी घडली. संदीप राघुजी नलावडे (वय ३४, रा. नेहरूनगर) असे आत्महत्या करणाऱ्याचे नाव आहे. नलावडे हे सकाळी घरी असताना त्यांनी विषारी औषध प्राशन केले. काही वेळाने त्रास होऊ लागल्याने कुटुंबीयांनी त्यांना यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात दाखल केले. मात्र, दुपारी दोनच्या सुमारास उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. ते महापालिकेच्या आरोग्य विभागात कर्मचारी होते. आत्महत्येचे नेमके कारण समजू शकलेले नाही.

# 'फॉरेन्सिक ऑडिट'साठी एका महिन्यात निविदा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात २०१७ ते २०२४ दरम्यान झालेल्या आर्थिक गैरव्यवहारांचे 'फॉरेन्सिक ऑडिट' करण्याची मागणी अधिसभा सदस्यांनी लावून धरत कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांना धारेवर धरले. दरम्यान, 'फॉरेन्सिक ऑडिट' करण्यासाठी एका महिन्याच्या आत निविदा काढण्यात येईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. गोसावी यांनी दिली.

अधिसभेला शुक्रवारी गदारोळात सुरुवात झाली. ३० सप्टेंबर २०२५ ला झालेल्या अधिसभेत 'फॉरेन्सिक ऑडिट' करण्याच्या मुद्द्यावर चर्चा झाली होती. त्यावेळी विद्यापीठातील आर्थिक गैरव्यवहारांचे 'फॉरेन्सिक ऑडिट' करण्यात येईल आणि त्याचा अहवाल ३१ मार्च २०२६ पर्यंत सादर करण्यात येईल, असे आश्वासन डॉ. गोसावी यांनी दिले होते. मात्र, मार्च संपत आला तरी अद्याप अहवाल न आल्याने सदस्यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. त्यात, विद्यापीठाने 'फॉरेन्सिक ऑडिट' करायचे की नाही हे ठरविण्यासाठी फेब्रुवारीला परस्पर समिती नेमल्याची धक्कादायक माहिती सभेसमोर आल्याने सदस्यांनी कुलगुरूंना धारेवर धरले.

दरम्यान, त्रयस्थ संस्थेमार्फत ऑडिट करण्यात येणार असून त्यासाठी एका महिन्याच्या आत निविदा प्रसिद्ध करण्यात येईल. ही कार्यवाही लवकर करण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात येईल, असे डॉ. गोसावी यांनी स्पष्ट केले. मात्र, हा निर्णय जाहीर करताना ते द्विधा मनःस्थितीत होते. यावर सदस्य प्रसेनजीत फडणवीस, विनायक आंबेकर आणि सचिन गोरडे पाटील यांनी मुद्द्याला अनुसरून निर्णय जाहीर करण्याबाबत आग्रही मागणी केली.

### ऑडिट कशासाठी

**■ विद्यापीठात विशेषतः २०१७-२२ या काळात तत्कालीन कुलगुरूंनी स्वतःला आर्थिक व्यवहारांबाबतचे अधिकार प्रदान केले. मात्र, त्याला राज्यपाल कार्यालय, अधिसभा, व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेतली नाही. त्यामुळे या काळात त्यांनी केलेले आर्थिक व्यवहार बेकायदा ठरतात. तसेच, 'कॅग'कडून २०१६-१७ ते २०२२-२३ या कालावधीतील लेखापरीक्षण करण्यात आले. त्यातील निरीक्षण अहवालातून गैरव्यवहार झाल्याची माहिती समोर आली आहे. म्हणूनच एक एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०२४ या काळातील हिशेब बेकायदेशीर आहेत. त्यामुळे त्याचे 'फॉरेन्सिक ऑडिट' करून चौकशीसाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमावी, अशी मागणी सदस्यांनी सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या सभेत केली होती.०**

# कुलसचिवांची नियुक्ती रद्द करण्यासाठी आंदोलन

'कुलसचिव पदाची नियुक्ती तातडीने रद्द करावी', 'रुसा'अंतर्गत ६२ कोटी रुपयांचा निधी अखर्चित ठेवणाऱ्या कुलगुरूंना हटवावे', 'पाच लाख विद्यार्थ्यांचे प्रलंबित निकाल तात्काळ जाहीर करावेत', 'कमवा व शिका योजनेचे मानधन वाढवावे', 'शिष्यवृत्ती त्वरित वितरित करावी' आणि 'प्लेसमेंट सुविधा बळकट कराव्यात', आदी मागण्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर विविध विद्यार्थी संघटनांनी जन आक्रोश आंदोलन केले.

विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समिती (विद्यापीठ युनिट), स्टुडण्ट हेल्पिंग हँड्स, रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषद, छात्रभारती, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, युवासेना यांसह अन्य संघटनांनी आंदोलन केले. अधिसभेची वार्षिक सभा सुरू असतानाच विद्यार्थ्यांनी प्रशासनाविरोधात घोषणाबाजी केली.

संघटनांच्या प्रतिनिधींशी भेट घेऊन विद्यापीठ प्रशासनाने मागण्यांचे निवेदन स्वीकारले. आंदोलनस्थळी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. देवीदास वायदंडे, डॉ. नितीन घोरपडे, अधिसभा सदस्य हर्ष गायकवाड, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनीही भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. आंदोलनात अभिषेक शेलकर, शिवा बारोळे, राहुल ससाणे आदी सहभागी झाले होते.

# किरकोळ वादातून तरुणावर कोयत्याने वार

**घोरपडी, ता. २७ :** बी. टी. कवडे रस्ता परिसरात रामनवमीच्या मिरवणुकीदरम्यान किरकोळ वादातून तरुणावर कोयत्याने वार करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. याप्रकरणी मुंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना हडपसर रेल्वे स्टेशन परिसरातील जाधव वस्तीमध्ये रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अक्षय आनंद गवळी (वय २७, रा. शक्तीनगर, बी. टी. कवडे रस्ता, घोरपडी) हा तरुण मिरवणुकीनंतर मित्राला सोडण्यास जात होता. त्यावेळी मिरवणुकीदरम्यान झालेला वाद पुन्हा उफाळून आला. या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. संशयित आरोपी काशीराम मोरे (वय ३०), अभिषेक मोरे (वय २७), नंदू थोरात (वय २९) आणि त्याच्या इतर साथीदारांनी अक्षय गवळीवर कोयत्याने वार करून गंभीर जखमी केले.

फिर्यादी आणि त्याचे मित्र मध्यस्थी करत असताना आरोपींनी त्यांनाही शिवीगाळ करत मारहाण केली. आरोपींचा शोध सुरू असून, दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# अरुणाचलमध्ये जवानांसाठी ऑक्सिजन प्रकल्प

## पुण्यातील 'सिर्फ' संस्थेचा उपक्रम; स्थानिकांनादेखील होणार उपयोग



**बोरारूपक, अरुणाचल प्रदेश :** 'सोल्जर्स इंडिपेंडंट रिहॅबिलिटेशन फाउंडेशन' (सिर्फ) या संस्थेच्या वतीने अरुणाचल प्रदेश येथील बोरारूपकमध्ये ऑक्सिजन निर्मिती व पुनर्भरण प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला, यावेळी उपस्थित मान्यवर.

**पुणे, ता. २७ :** देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानांसाठी प्रतिकूल हवामानात प्राणवायूचा (ऑक्सिजन) पुरवठा सुलभ व्हावा, या उद्देशाने पुण्यातील 'सोल्जर्स इंडिपेंडंट रिहॅबिलिटेशन फाउंडेशन' (सिर्फ) या संस्थेने अरुणाचल प्रदेश येथील बोरारूपक येथे चौथा ऑक्सिजन निर्मिती व पुनर्भरण प्रकल्प कार्यान्वित केला आहे.

यावेळी लेफ्टनंट जनरल अभिजित पेंढारकर, मेजर जनरल विवेक बक्षी, ४५६ फिल्ड हॉस्पिटलचे कमांडिंग ऑफिसर कर्नल जाफर हुसेन, सिर्फ संस्थेच्या संस्थापिका सुमेधा चिथडे, सचिव अनुराधा कोटीभास्कर आदी उपस्थित होते. सीमावर्ती भागात प्रतिकूल परिस्थितीत कार्यरत असलेल्या जवानांसाठी तसेच स्थानिक नागरिकांसाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरणार आहे. यापूर्वी सियाचिन, जम्मू-काश्मीर येथील कुपवाडा आणि अरुणाचल प्रदेश येथील तवांग येथे असे प्रकल्प उभारले असून, आता चार प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत.

भारतीय हवाई दलातील माजी सैनिक दिवंगत योगेश चिथडे आणि त्यांच्या पत्नी सुमेधा चिथडे यांनी या संस्थेची स्थापना केली आहे. योगेश यांच्या निधनानंतरही सुमेधा यांनी सहकाऱ्यांच्या मदतीने हे सेवाव्रत सुरू ठेवले आहे. सुमेधा चिथडे यांनी स्वतःचे दागिने आणि जमापुंजी अर्पण करून या कार्याची मुहूर्तमेढ रोवली होती.

# घरफोडी करणाऱ्या कुख्यात बांगलादेशी आरोपीला अटक

**पुणे, ता. २७ :** विविध राज्यांत ५० हून अधिक घरफोडी करणाऱ्या कुख्यात बांगलादेशी आरोपीला अलंकार पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याविरुद्ध आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यांत एकूण ३६ गुन्हे दाखल असल्याचे समोर आले आहे.

महम्मद बशर नूर मोहम्मद (वय ३८, मूळ रा. ढाका, बांगलादेश) असे अटक केलेल्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कर्वेनगरमधील 'द टेरीटरी' या कार्यालयात १५ मार्च रोजी खिडकीचे गज तोडून चोरट्याने सहा लाख ७१ हजार रुपयांचा कॅमेरा, लेन्स, ड्रोनसह इतर इलेक्ट्रॉनिक वस्तू चोरून नेल्या होत्या. याप्रकरणी अलंकार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपी दुचाकीवरून पळून गेल्याचे निष्पन्न झाले. तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने त्याचा माग काढत तो हैदराबाद, चंद्रपूर, नागपूर, जबलपूरमार्गे वाराणसीपर्यंत पोहोचल्याचे उघड झाले. त्यानंतर वाराणसी पोलिसांच्या मदतीने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. आरोपी वेगवेगळ्या नावांनी बनावट ओळखपत्र तयार करून गुन्हे करत असल्याचे उघड झाले आहे. त्याच्याकडून चोरीस गेलेला सहा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई अतिरिक्त पोलिस आयुक्त राजेश बनसोडे, उपायुक्त संभाजी कदम, सहाय्यक आयुक्त सुजाता तानवडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक उल्हास कदम यांच्या पथकाने केली.

# पर्वतीत सराइताच्या घरातून शस्त्रसाठा जप्त

**पुणे, ता. २७ :** पर्वती परिसरात पोलिसांनी सराइताच्या घरावर छापा टाकत धारदार शस्त्रसाठा जप्त केला. यामध्ये लोखंडी पालघन आणि तलवारींसह अवैध शस्त्रे हस्तगत केली असून, आरोपीला अटक केली आहे.

२५ मार्चला पर्वती पोलिस ठाण्याच्या हद्दीत कोम्बिंग ऑपरेशन सुरू होते. त्यावेळी पोलिस अंमलदार महेश मंडलिक आणि राकेश सुर्वे यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे तपास पथकाने सापळा रचला. यावेळी शैलेश विजय कसबे (रा. जनता वसाहत, पर्वती) याला ताब्यात घेतले. त्याच्या घराची झडती घेतली असता १० धारदार लोखंडी पालघन आणि दोन तलवारी, असा शस्त्रसाठा जप्त केला. या प्रकरणी पर्वती पोलिस ठाण्यात शस्त्र प्रतिबंधक कायदा (आर्म्स ॲक्ट) अन्वये गुन्हा दाखल झाला. पुढील तपास हवालदार प्रकाश मरगजे करत आहेत. ही कारवाई पोलिस उपआयुक्त मिलिंद मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र सहाणे आणि निरीक्षक (गुन्हे) अनिता हिवरकर यांच्या पथकाने केली.


**नवी मुंबई महानगरपालिका**

जा.क्र.नमुंमपा/प्रशासन/आस्था-1/1063/2026
दि. :- 27 /03/2026.

**सरळसेवा भरती 2025-2026 - सूचनापत्र**

**विषय** :- जाहिरात क्रमांक आस्था/02/2025, जाहिरात क्रमांक आस्था/03/2025 व जाहिरात क्रमांक आस्था/04/2025, दिनांक 14/12/2025 च्या अनुषंगाने **ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकृतीच्या दिनांकास मुदतवाढीबाबत.**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या नियमीत आस्थापनेवरील गट-अ, गट-ब व गट-क मधील सरळसेवेच्या रिक्त पदांवर पदभरती करणेबाबतची जाहिरात क्रमांक आस्था/02/2025, जाहिरात क्रमांक आस्था/03/2025 व जाहिरात क्रमांक आस्था/04/2025, दिनांक 14/12/2025 रोजी दैनिक वृत्तपत्रांमध्ये तसेच सविस्तर जाहिरात नवी मुंबई महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याचा दिनांक 20/01/2026 ते ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्विकृतीचा अंतिम दिनांक 01/03/2026, वेळ रात्री 11.55 पर्यत विहीत करण्यात आला होता.**

2. **तथापि उपरोक्त जाहिरातींच्या अनुषंगाने ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्यास दिनांक 01/04/2026 ते अर्ज स्विकृतीचा अंतिम दिनांक 15/04/2026 वेळ रात्री 11.55 पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.**

**विहित पध्दतीने अर्ज सादर करून ऑनलाईन शुल्क भरण्याची कार्यवाही दि.15/04/2026, वेळ रात्री 11.55 वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.** विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

3. दिनांक 14/12/2025 रोजी प्रसिध्द जाहिरातीमधील व दि.19/01/2026 रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या शुध्दीपत्रकातील इतर अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल नाही.

सही/-
(डॉ.कैलास शिंदे)
आयुक्त
नवी मुंबई महानगरपालिका

जा.क्र.नमुंमपा/जाहिरात क्रा./243/2026



**सांगोले नगरपरिषद, सांगोले**
**जि. सोलापूर**

जा.क्र./सानप/बांध/१५३३ | दिनांक २७/३/२०२६

**ई-निविदा प्रसिद्धी सूचना**

सांगोले नगरपरिषद, जि. सोलापूर ''स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.०'' अंतर्गत जुन्या साठलेल्या कचऱ्यावर बायोमायनिंग (Legacy Waste Remediation) शास्त्रोक्त प्रक्रिया करून कचऱ्याची विल्हेवाट लावणे कामाची ई-निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदार यांच्याकडून मागविण्यात येत आहेत. कामाचा सविस्तर तपशील **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर **दिनांक २७-०३-२०२६ ते ०४-०४-२०२६ रोजी** पर्यंत उपलब्ध आहे.

स्वाक्षरित/-
**(डॉ. सुधीर गवळी)**
मुख्याधिकारी, नगरपरिषद सांगोले



**MAHARASHTRA STATE INSTITUTE OF HOTEL MANAGEMENT AND CATERING TECHNOLOGY AND RESEARCH SOCIETY, PUNE**
**(UG & PG DEGREE PROGRAMME)**
**website- www.msihmctrs.in ☎: 020-25676640**

**CORRIGENDUM**

Cancellation of Recruitment for Assistant Professor position notified vide advertisement dated 11-03-2026. It is notified for the information of all the concerned candidates that recruitment for the position of Assistant Professor stands cancelled due to administrative reasons.

**Competent Authority**
M.S.I.H.M.C.T. & Research Society, Pune



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, मरोळ औद्योगिक क्षेत्र, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९३ । दूरध्वनी क्र. (०२२) ४७४८८३१२/४६९९/४६७९
संकेतस्थळ : adminofficer@midcindia.org

**निविदा सूचना**

क्र.मऔविम/साप्रवि/स्टाफ बस/भांडार/०५/२०२५-२६

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुख्यालय, मुंबई येथील मुख्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना ने-आण करणेकरीता स्टाफ बस सुविधा पुरविणेकरिता www.mahatender.gov.in व्दारे ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाचे ई-निविदा फॉर्म दि. ३०/०३/२०२६ ते दि. १३/०४/२०२६ शासनाच्या www.mahatender.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

एखादी अथवा सर्व निविदा कुठलेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने राखून ठेवला आहे.

**महाव्यवस्थापक (मबवि)**
**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**



**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES**
Mhasrul, Dindori Road, Nashik - 422 004.
Tel: (0253) 2539149 | EPABX:0253-2539100,300
Email: registrar@muhs.ac.in/purchase@muhs.ac.in,
Website:http://www.muhs.ac.in

**E-tender Notice No. MUHS/PUR/03/2026**

Maharashtra University of Health Sciences, Nashik invites proposals for supply, installation and commissioning of Four Capillary Genetic Analyzer (Sanger) at MUHS Regional Center, Pune.
For the detailed Tender document, interested bidder should visit **http://mahatenders.gov.in** and **www.muhs.ac.in.**
Tender submission would be online at **www.mahatenders.gov.in** and the deadline to submit the proposals is **16/04/2026.**

Date: 28/03/2026

**Registrar**
MUHS, Nashik



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
**(महाराष्ट्र शासन अंगीकृत)**

**ई-निविदा सूचना क्र. १५/२०२६**

खालील कामांसाठी म.औ.वि. महामंडळ नोंदणीकृत ठेकेदारांकडून मोहोरबंद ई-निविदा मागवीत आहे. सदर ई-निविदा **(www.mahatenders.gov.in)** या संकेतस्थळावर उपलब्ध होतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये | कोरी ई-निविदा उपलब्ध कालावधी |
|---|---|---|---|
| (अ) | **का.अ., मऔविम, प्रकल्प विभाग, पुणे** | | |
| १ | चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २... रस्त्याची देखभाल व दुरुस्ती... मे. सी एन एच च्या भोवतालच्या अंतर्गत रस्त्याचे खड्डे भरणे. | ३९,६९,००९/- | ०२-०४-२०२६ ते १७-०४-२०२६ |
| (ब) | **का.अ., मऔविम, स्थापत्य विभाग, पुणे** | | |
| १ | डी.सी. वर्क-इंद्रायणी इंडस्ट्रियल इस्टेट, ताकवे बु., ता. मावळ, जि. पुणे... पायाभूत सुविधा पुरविणे, सिमेंट काँक्रिट रस्ता, ड्रेनेज पावसाच्या पाण्याच्या गटारी आणि संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. **(उत्तर अर्हता प्रपत्रे (www.mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध होतील)** | १५,९४,१०,८८६/- | ०२-०४-२०२६ ते २७-०४-२०२६ |
| (क) | **का.अ., मऔविम, मा. तं. विभाग, पुणे** | | |
| १ | राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान टप्पा क्र. ३, हिंजवडी... रस्ता देखभाल व दुरूस्ती... पावसाळ्यापूर्वी आणि पावसाळ्यानंतर सी.डी. वर्क, पाईप, तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या गटारांची स्वच्छता करणे. | ३९,५९,३८७/- | ०२-०४-२०२६ ते १७-०४-२०२६ |
| २ | जोग सेंटर अनिवासी इमारत देखभाल व दुरुस्ती... प्रादेशिक अधिकारी-२ यांच्या कार्यालयासाठी फर्निचर पुरवठा करणे. | ५४,२८,९३७/- | ०२-०४-२०२६ ते १७-०४-२०२६ |
| (ड) | **का.अ., मऔविम, विवयां. विभाग, पुणे** | | |
| १ | चाकण औद्योगिक क्षेत्र... पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती... टप्पा क्र. १,२ आणि ३ येथील उदंचन केंद्रे यांची वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. **(दुसरी मागणी)** | ४०,२९,६००/- | ०२-०४-२०२६ ते १३-०४-२०२६ |